# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक १०.०७.२०२६ शुक्रवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०९.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०७ केसेसमध्ये ०८ ईसमांवर कारवाई करून ५,३०१/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०१ केसमध्ये ०१ ईसमावर कारवाई करुन ४४०/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,९३६ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,८६,९५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथक पोलीसांची कामगिरी :— अग्निशस्त्र बाळगणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक १०.०७.२०२६ चे ००.२० वा. ते ०२.२० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, पोलीस ठाणे नवीन कामठी हद्यीत कामठी रोडवरील स्वाद पंजाब फॅमिली गार्डन ढाबा परिसरात मोहम्मद फरमान नावाचा एक इसम ज्याने अंगात काळया रंगाचा फुलबाहीचा शर्ट व निळया रंगाचा जिन्सपॅन्ट घातलेला असून तो प्राणघातक शस्त्रासह फिरत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन परिसरात शोध घेतला असता, एका नवनिर्माणाधीन बिल्डींग जवळ प्राप्त वर्णनाचा इसम दिसून आला. त्यास ताब्यात घेऊन त्याचे नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव मोहम्मद फरमान वल्द मोहम्मद फिरोज शेख वय २७ वर्षे रा. बेबी कॉलनी, गरीबनवाज मस्जिदजवळ, येरखेडा, नवीन कामठी, नागपुर असे सांगितले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत पॅन्टचे आत एक अग्निशस्त्र (माऊजर) व उजवे खिशात एक जिवंत काडतुस मिळून आले. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने त्याचा साथीदार आरोपी नामे शेख हबीब वल्द शेख हुसेन वय ४० वर्षे, रा. गोंडेगाव, कॉलनी मागे, ता. पारशिवनी, जि. नागपूर याचेकडून खरेदी केल्याचे सांगीतले. आरोपीचे ताब्यातून अग्निशस्त्र (माऊजर), एक जिवंत काडतुस व एक मोबाईल फोन असा एकुण किंमती अंदाजे ६१,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने अग्नीशस्त्र बाळगुन मिळुन आल्याने व त्यांनी मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे नवीन कामठी येथे दोन्हीही आरोपींविरूध्द कलम ३,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. दोन्ही आरोपींना अटक करून मुद्येमालासह पुढील कार्यवाहीस्तव नवीन कामठी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (अति.कार्य.गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनात, पोनि. भारत क्षीरसागर, सपोनि संदीप जाधव, पोहवा. शेख इमरान, ज्ञानेश्वर भोगे, रत्नाकर कोठे, विवेक अढाऊ, मपोहवा. अनुप यादव, पोअं धनपत मंझरेटे, सतोंष शेंद्रे व चापोअं. राहुल पाटील यांनी केली.



**३) पोलीस उपआयुक्त परिमंडळ क्र. १ विशेष पथकाची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०९.०७.२०२६ चे २१.०० वा. ते २१.३० वा. चे दरम्यान, मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे विशेष पथक हे पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, वानाडोंगरी परिसरात एक इसम गांजा विक्री करीत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन वानाडोंगरी परिसरात पाहणी केली असता, वायसीसी कॉलेजसमोरील आर्यन जीमजवळ मोकळया जागी प्राप्त वर्णनाचा एक इसम कॉलेज बॅगसह संशयास्पदरित्या कोणाची तरी वाट पाहत असतांना दिसून आला. त्याचेकडे जात असता, तो पोलीसांना पाहून पळू लागला. त्याचा पाठलाग करुन, ताब्यात घेतले. त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव निहाल प्रमोद तडस वय ३२ वर्ष रा. वानाडोंगरी, बाबडे ले—आऊट, कृष्णा लॅन्डमार्क जवळ, ता. हिंगणा, जि. नागपूर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याचे जवळील बॅगची पाहणी केली असता, बॅगमध्ये हिरवट काळसर झाडपत्तीसारखा उग्र वास येणारा अंमली पदार्थ गांजा वजनी एकुण ४ किलो ३० ग्रॅम एकूण कि. ६०,०००/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब),(ii)(ब) एन. डी.पी.एस. अॅक्ट नुसार होत असल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे एमआयडीसी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्येमालासह एमआयडीसी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग), मा. श्री. सिंगा रेड्डी ऋषिकेश रेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. १), मा. श्री. सतिशकुमार गुरव, सहा. पोलीस आयुक्त (एमआयडीसी विभाग), वपोनि. गोकुळ महाजन यांचे मार्गदर्शानाखाली, सपोनि. गजानन काठेवाडे, पोहवा. दीपक ठाकूर, इस्माईल नौरंगाबादे, अजय गिरडकर, सचिन इंगळे, नापोअं. आनंद वानखेडे, पोअं. स्वप्निल करंडे, दिगांबर पठाडे, मनोहर राठोड, ऋषभ भातुलकर, अश्विन चौधरी, विवेक झाडे व पंकज मिश्रा यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे नवीन कामठी :— हद्पार ईसमास अटक.**

दिनांक ०९.०७.२०२६ चे १९.२० वा. ते १९.४५ वा. चे दरम्यान, नवीन कामठी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, जयस्तंभ चौकाजवळ एक हद्दपार आरोपी इसम फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळुन जात असता, त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. त्याचे नाव

पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव शेख सलमान उर्फ अब्बु वल्द शेख हुसेन, वय २८ वर्षे, रा. चित्तरंजन नगर, अब्दुल शाह दर्गाजवळ, कामठी, नागपूर असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०६ यांचे हद्दपार आदेश क्र. ०७/२०२२ दिनांक २२.०४.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतील पोलीस ठाणे पारशिवनी, खापा, सावनेर, कळमेश्वर, कन्हान, मौदा व कुही येथून ०१ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोअं. नितेश नवघडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नवीन कामठी येथे पोउपनि. विकास तिडके यांनी आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे पारडी :— सदोष मनुष्यवधाचा प्रयत्न करुन शासकीय कामात अडथळा निर्माण करणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक ०८.०७.२०२६ चे २०.३० वा. ते २०.४० वा. चे दरम्यान, वाहतुक परिमंडळ पारडी चे फिर्यादी पोहवा. अतुल ठाकरे हे पोलीस ठाणे पारडी हद्दीतील हनुमान मंदीर चौक येथे आपले कर्तव्यावर हजर असतांना, एका ऑटोरिक्षा क्र. एमएच ४९ सीएफ १७४० चा चालक नामे प्रणय उर्फ अंकित रामकुमार देशमुख, वय २८ वर्ष, रा. गल्ली क्र. ०१, अंबे नगर, भांडेवाडी, पारडी, नागपूर याने त्याचे ताब्यातील ऑटोरिक्षा भरधाव वेगाने निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवून हनुमान मंदीर चौकात एका दुचाकी पल्सर गाडीला धडक दिल्याने पल्सर गाडीवरील स्वार दोन इसम व लहान मुलगा खाली पडून गंभीर जखमी झाले. ऑटोरिक्षा चालक घटनास्थळी न थांबता बेदरकारपणे तेथून पळून जात असता, त्याने दुसऱ्या एका ॲक्टिवाला धडक दिली असता, फिर्यादी पोलीस हवालदार यांनी सतर्कतने व शिताफीने त्यास पकडुन, ऑटोरिक्षा चालक आरोपीस ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास विचारणा करीत असता, त्याने आरडाओरडा करुन व उध्दटपणे प्रतिसाद देऊन 'संपुर्ण रस्ता जाम करुन टाकीन व जो समोर येईल त्यास मग मी पाहून घेईन' अशी फिर्यादी यांना धमकी दिली. तसेच, त्याचे मोबाईल फोनवर फिर्यादीचा व्हिडीयो शुट करायला लागला. आरोपीची ब्रिथ ॲनालायझरद्वारे मद्यार्क पिल्याबाबत चाचणी केली असता, त्याने दारुचे सेवन करुन, वाहन चालवित असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीस पोलीस ठाणे येथे आणून त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्याचेवर भा.ह.का. व भा.न्या.सं. अन्वये वेगवेगळे २६ गुन्हे दाखल असून, तो सराईत गुन्हेगार असल्याचे दिसून आले. आरोपीचे सदरील कृत्यामुळे सदोष मनुष्यवध घडू शकतो अशी त्यास जाणिव असतांना सुध्दा त्याने जाणिवपुर्वक तसे कृत्य करुन आणि फिर्यादी पोलीस हवालदार यांचेसोबत असभ्य वर्तन करुन व धमकावून शासकीय कामात अडथळा केला.

याप्रकरणी फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे पारडी येथे सपोनि. गजानन कंकाळ ९०४९५००३५६ यांनी आरोपीविरुध्द कलम ११०,२८१,२२१,३५१(२) भा.न्या.सं., सहकलम १८४,१८५ मो.वा.का., सहकलम ८५ म.दा.का. अन्वये गुन्हा दाखल करुन, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरु आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे गिट्टीखदान :</u>—** दिनांक २२.०६.२०२६ चे २३.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत, पोलीस तलाव लेबर क्वॉर्टर, नागपूर येथे हल्ली मुक्कामी राहणारे मिकाऊल हुसेन वल्द मुकलेश शेख, वय २० वर्ष हे पोलीस तलाव लेबर क्वॉर्टर येथे झोपले असतांना, त्यांना सर्पदंश झाल्याने, त्यांची प्रकृति खराब झाली. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल, वार्ड क्र. १७,१८ येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान दिनांक ०९.०७.२६ चे ०२.५३ वा. वार्डचे डॉक्टरांनी तपासुन त्यांना मृत घोषीत केले.

यांप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे सपोनि. बालाजी लालपालवाले ९१३००५९३८८ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**